# पोलीस स्टेशन बिबी

पोलीस स्टेशन बिबी हद्दीतील श्रीराम मंदिर सभागृहामध्ये गावातील नागरिकांसाठी कायद्यासंदर्भाने जनजागृती करणेसाठी कार्यशाळा घेण्यात आली. नवीन कायदे भारतीय न्याय संहिता- 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 तसेच I.T. Act, सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधासंबंधाने घ्यावयाची दक्षता, महिला विद्यार्थी सुरक्षा, गुड टच बेड टच, सायबर क्राईम, मोबाईल सोशल मीडिया बाबत घ्यायची दक्षता व गुन्हे, डायल 112, वाहतूक नियम पालन, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले विद्यार्थी व पालक यांना  मार्गदर्शन तसेच पोक्सो कायद्या अंतर्गत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकतेबाबत सतर्क राहून आपणाकडून कायद्याचे कुठलेही उल्लंघन होणार नाही व अशा घटनांपासून स्वत:चा बचाव कसा करावा पोलिसांची व विधी सल्लागार यांची मदत कशी घ्यावी तसेच कायदेशीर मार्गदर्शन कसे प्राप्त करावे याबाबत नागरीकांना माहिती देण्यात आली.